# महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२

दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com


**जावक क्र.महाज्योती/पीएचडी-२०२३/२८२२/२०२४-२५,** **दि.११.१०.२०२४**

## परिपत्रक

**विषय :- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) -२०२३ योजनेअंतर्गत अवार्ड लेटरबाबत.**

**संदर्भ :- १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. सान्यवि-२०२४ / प्र.क्र.७७ / बांधकामे, दि.२५.०७.२०२४**

**२. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. महाज्यो - २०२४/ प्र.क्र.४८ / संस्था, दि.११.१०.२०२४**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात करण्यात येते की, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती २०२३ करिता अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर प्रक्रियेमध्ये एकूण १४५३ ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले असून प्राप्त अर्जाची छाननी केली असता १३८१ अर्ज कागदपत्र पडताळणीकरीता पात्र असुन व ७२ अर्ज अपात्र झालेले आहे. दि.०७.०८.२०२४ ते दि.२२.०८.२०२४ या दरम्यान पार पडलेली असुन विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणीची मुदतवाढ दि.०७.१०.२०२४ रोजी पर्यंत देण्यात आलेली होती. यामध्ये दि.०७.१०.२०२४ पर्यंत एकूण ९०१ विद्यार्थी पात्र असुन सदर विद्यार्थ्यांनी त्याच्या MIS वरील लॉगीनला जाऊन अवार्ड लेटर प्राप्त करुन घ्यावेत.

तसेच दि.३०.११.२०२४ पर्यंत खालील कागदपत्रे या कार्यालयात पोस्टाने पाठविणे आवश्यक आहेत. तसेच सर्व कागदपत्रे लॉगीनला स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहेत.

सादर करावयाचे कागदपत्रे -

१. UNDERTAKING FOR THE CANDIDATE PURSUING Ph.D
२. JOINING REPORT( Annexure - III )

**अवार्ड लेटर प्राप्त करुन घेण्यासाठी खालील सुचनांचे पालन करावे :-**

१. पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेलवर लिंक प्राप्त झालेली आहे.
२. प्राप्त लिंकवर Click करावे, सदर लिंक आपल्याला पीएचडी MIS वर घेवून जाईल त्यातील पीएचडी २०२३ Login वर Click करावे.
३. आपला नोंदणीकृत मोबाईल क्रमांक टाकावा त्यावर आपल्याला OTP प्राप्त होईल. सदर अचूक OTP टाकावा व त्यानंतर आपली प्रोफाईल समोर दिसेल.

४. प्रोफाईल वरील Letter मध्ये जावे. तेथे Download Award Letter वर Click करावे व Award Letter प्राप्त करुन घ्यावे.
५. Award Letter प्राप्त झाल्यावर परिपत्रकात नमुद वरील दोन कागदपत्रे न चुकता दि.३०.११.२०२४ पूर्वी या कार्यालयात समक्ष किंवा पोस्टाने सादर करावेत.
६. संशोधन प्रगती अहवाल सादर करण्याबाबतच्या सुचना महाज्योतीच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

अवार्ड लेटर लिंक :- https://phdmis.mahajyoti.org.in

उपरोक्त कागदपत्राचे नमुने महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची नोंद घ्यावी.

**मा.व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने**

-स्वा-

**(कुणाल शिरसाठे)**
**प्रकल्प संचालक**
**महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती),महाराष्ट्र राज्य, नागपुर**